ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2022- Vol. 11 No. 2

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आर्थिक विचार

**प्रा. डॉ. वासुदेव ज.चौधरी**
*विद्या विकास कला वाणिज्य व विज्ञान*
*महाविद्यालय समुद्रपूर जि.वर्धा*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उद्योगांचे राष्ट्रीकरण, धान्य–प्रश्न, समाजवाद, सामाजिक समता या विषयावरही त्यांनी लिखाण केले होते. अस्पृश्य समाजात भुमीहीन मजुरांचा भरणा अधिक असल्याने त्यांनी त्या विषयावर मत प्रदर्शित करताच भुमिहीन मजुर, जमिनी, खेतीपध्दती, महारवतन, सामुदायिक शेती ग्रामिण महसूल आणि जमिणदाशाहीचे उच्चाटन या विषयावर त्यांनी निरनिराळया वेळी विचार प्रकट केले होते.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न, कायदेपंडीत या सारख्या अनेक बिरूदावलिंनी सन्मानित झालेले डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हे एक श्रेष्ठ दजाचे अर्थशास्त्रज्ञ होते. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय विचाराबरोबरच आर्थिक विचारातही महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पदव्युत्तर शिक्षणांचा विषय अर्थशास्त्र हा होता.

कोलंबिया विद्यापिठात एम.ए. साठी प्राचीन भारतीय व्यापार व पीएच.डी. साठी ब्रिटीश हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थरचनेची उत्क्रांती असे त्यांचे विषय होते. लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डी.एस.सी. साठी त्यांनी रूपयांचा प्रश्न हा प्रबंध लिहिला.

डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार समजून घेण्यासाठी त्यांच्या अर्थशास्त्रांतील अभ्यास विषयांचे खालील प्रमाणे विभाग पाडून त्यांच्या विचारांचा आढावा घेता येतो.

**1. चलन विषयक प्रश्नः**

डॉ. आंबेडकर यांचा जीम Problem of the Rupee हा ग्रंथ 1923 मध्ये प्रसिध्द करतांना लंडन मधी P-S King And Company ने हा ग्रंथराज पुस्तक रूपाने प्रसिध्द केला आणि या पुस्तकासाठी सुप्रसिध्द अर्थतज्ञ प्रो. कॅनन यांनी प्रस्तावना लिहिली होती. तसेच या ग्रंथामध्ये इंग्लंड व भारतामधील पगारदारांचे उत्पन्न व वस्तुचे भाव यांची तुलना करतांना इंग्लंडमध्ये पगार जास्त तर भाव कमी तर भारतात पगार कमी व वस्तुचे भाव जास्त त्यामुळे रूपायाची क्रयशक्ती घटत चाललेली निदर्शनास आणली. The Problem of the Rupee its origin and its Solution 1923 हा प्रबंध डॉ. आंबेडकरांचे चलन विषयक विचार त्यांची डि एसस्सी पदवी करतांना लिहिला आणि–1925 मध्ये त्यांनी हिल्टन यंग कमिशनपूढे दिलेली साक्ष यात सापडतात.

अर्थव्यवस्था सुरळीत चालवण्यासाठी पैसा हा अर्थव्यवस्थेत चक्राकार गतिने फिरत राहीला पाहिजे व या चलनवाढीचे गंभीर परिणाम जेव्हा अर्थशास्त्र फारसे विकसीत तेव्हाच डॉ. आंबेडकरांनी 70 वर्षापूर्वीच सांगीतले व त्यांच्याच असामान्य अभ्यासाचे उत्कृ" ठ उदाहरण म्हणून आपल्यास सांगता येईल.

**विनिमय परिणामः**

विनिमय परिमानाला त्यांनी विरोध करतांनाच अपरिवर्तनीय रूपया व चलन वाढल्याची निश्चित मर्यादेच्या उपाय म्हणजे चांदीची रूपया वितळवून त्यातून निर्माण होणारा पैसा महसूलसाठी वापरणे आणि अपरिवर्तनीय अशा चलनाने पोकळी भरून काढणे हे मार्ग होते. डॉ. आंबेडकरांनी यासाठी आग्रही भुमिका न धरता संस्कार आणि जनता यासाठी टाकसाळ बंद करणे हा होता.

1914 मधील चेंबर्ले कमीशन विनिमय परिणामाला अनुकूल होते. सरकारची आर्थिक स्थिती सुधारण्याबरोबर व्यापार वृध्दी होईल असे वाटल्याने त्यांचे विनिमय परिणामाबददल अनुकूल मत झाले होते. व ही चलन पध्दती सर्वश्रे" ठ आहे असा सर्वत्र समज होता कारण सोन्याशी निश्चित केलेले रूपयाचे विनिमय मुख्य स्थिर ठेवायला मदत करते.

**हिस्टन यंग कमीशन पुढील साक्षः–**

भारताच्या चलन विषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी 1925 साली नेमण्यात आलेले होते. या कमिशन पुढे अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांना बोलविण्यात आले होते. त्यावेळी कमीशनने तयार केलेल्या प्रश्नावलीचा अभ्यास करून त्यावर त्यांनी आपली साक्ष दिली.

आपल्या statement of Evidence च्या सहाव्या कलमात डॉ. आंबेडकर म्हणतात. Convertible in Gold no to be Rupee but so the Convertibles rupee but to circulate as Unlimited tender at earth ratio fixes by low'

भारतीय परिवर्तनीय अगदी चलन पध्दती योग्य आहे. फक्त त्या चलनाला सोन्याच्या निश्चित प्रवाहास आधार असणे आवश्यक आहे.

सोन्याची किंमत कमी झाल्याने वस्तूंचा किमतीत वाढ झाली. किंमती खाली आणण्यासाठी सोन्याची किंमत पूर्ववत करावयास पाहिजे. 1910 नंतर सोन्याच्या निर्मितीत वाढ झाली. त्याचा परिणाम असा झाला की त्यांनतर

विनिमय परिणाम चालू ठेवून निरनिराळया देशातील किमतीत होणारी वाढ रोखता आली नव्हती.

भारतात सुवर्ण परिणाम स्विकारावयाचे असेल तर त्या चलनातील सोन्याचा साठा वाढवीला पाहिजे परंतू याचा अर्थ असा नव्हे की दैनंदिन व्यवहारात सोन्याची नाणी वापरली जावीत.

कमिशनने विचारले किंमतीची पातळी जुळवून घेण्यासाठी विनिमय परिणामाचा उपयोग करावा असे तुम्ही सुचविता काय? त्याची त्यांनी उत्तर दिले नाही 1914 मध्ये असलेले 16 पेन्स, 1926 सालीही कायमच आहे असे मी मानत नाही. किमतीची पातळी ही लक्षात घ्यावयास पाहिजे.

रूपयाचा दर 16 पेन्स व 18 पेन्स यांचा सुवर्णमध्ये साधेल असा असावे असे त्यांनी शेवटी सुचविले.

**2. शेतिविषयक प्रश्नः–**

डॉ.आंबेडकरांनी शेती व्यवस्थेचे संबंधीचे विचार आपल्या लेखनात मांडले आहे. डॉ आंबेडकर भोतिविशयक प्रश्न मांडताना शेतजमिनीची खाजगी मालकी रदद करून त्याऐवजी सामुदायीक मालकी प्रस्तापीत करावी असे त्यांचे मत होते. विखूरलेलया जमिनीच्या तुकडयामुळे होणारे दुष्पपरिणाम जमिनीच्या एकत्रीकरणामुळे कमी होतील, पण एकत्रित आणलेल्या जमिनी जर आर्थिक दृष्टिने फलदायी नसतील त्याचा काहीही उपयोग नसतो असे त्यांना वाटत होते. योग्य तो खर्च दिल्यानंतर, स्वतःला व कुटूंबात योग्य अशा सुखात राहण्यासाठी ज्या ठिकाणी उत्पन्न निघते ही नेहमीची आर्थिक दुष्टयीनी फलदायी शेतजमिनीची व्याख्या त्यांनी मान्य केली नव्हती. त्यावर टिकाच केली होती. ही व्याख्या उत्पादनावर अधिष्ठित नसून उपयोगावर अधिश्ठित असते. अशी टिका त्यांनी केली.

**समुदायीक रोतीचे व्यवस्थापण :–**

सामुदायीक शेतीचे व्यवस्थापण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी खालील मार्ग सांगीतले आहे.

**1. कुळकायदा :**

जमिनीचे हिस्से एकत्रीकरण आणि कुळकायदा ही अधिकच वाईट व निरूपयोगी असतात त्यामुळे शेतकऱ्यांची भरभराट होत नसते. फक्त सामुदायीक शेतीमुळेच भुमिहीन मजुरांचा प्रश्न सुटेल. असे त्यांना वाटत होते.

**2. जमिनदारी पध्दतीः**

जमिन कसल्याच्या दृष्टि विचार करता जमिनदारी पध्दती असमर्थनिय होत चालली होती ती रदद करावी यावरच त्यांनी भर दिला होता. परंतू जरी आम्ही आमच्या जमिन दारशाहीचे उच्चाटन केले तरी अथवा मार्गानी आम्ही आमच्या अर्थव्यवस्थेची बांधणी करू शकणार नाही. आमच्या शेतकऱ्यांच्या सर्व दृष्टिकोण बदलला पाहिजे. तरच जमिनदारशाहीचे उच्चाटन केल्याची फटके आम्हाला चाखायला मिळतील.

**3. जमिन महसुलः**

काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्त्पन्न असणाऱ्यांना जमिन महसूलाची माफी मिळाली पाहीजे जमिन महसुलाच्या बाबतीत गरीब व श्रीमंत यांना सारखाच कर भरावा लागत असतो. म्हणून जमिन महसूल संहितेचे लॅन्ड रेव्हेन्यू कोड 107 चे कलम 26 करून जमिन महसूल प्राप्तीकरच्या कक्षेत आणला पाहिजे असे मत त्यांनी प्रतिपादन केले होते.

**4. भांडवल :**

शेतीत सरकारी मालकी, सामुदायीक स्वरूपाची जमिन महसूल उद्योगक्षेत्रातील सौम्य स्वरूपाचा राज्य समाजवाद अशा तत्वाचा त्यांनी पुरस्कार केला होता. शेतीत आवश्यक असे भांडवल सरळपणे पुरवावे, तसेच भारतात जलद औद्योगीकरण करण्यासाठी राज्य समाजवाद आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले होते. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने ठिक–ठिकाणी खते, अवजारे, कृषि पूरक उद्योग धंदे इत्यादीसाठी भांडवल पुरवावे.

**5. सार्वजनिक आय व्यय :–**

The evaluation of provincial finance in British India हा एम.एस.सी. Economics साठी लिहिलेल्या प्रंबधात डॉ. आंबेडकरांचे आय व्यय संबंधीचे विचार आपल्याला पाहावयास मिळतात. भारतीय राज्यघटनेच्या 277 व्या कलमावर घटना समितीत झालेली चर्चा, स्वतंत्र मजुर पक्षाच्या जाहिरनाम्यात प्रतित झालेले करविषयक धोरण, अंदाजपत्रकावरील भावाणे व मान्यताला करावरील त्यांची भाषणे यात सार्वजनिक आप व्यया संबंधीचे विचार दिसून येतात.

**करविषय धोरण :**

डॉ. आंबेडकरांनी 1936 मधील मजुर पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात कर आकारणीसंबंधीचे काही तत्वे सांगीतली ती पुढील प्रमाणे आहे.

1. कर भरण्याच्या पात्रतेवर कर आकारणी असावी, उत्पन्नावर कर आकारणी ठेवू नये.
2. कर पुरोगामी असावा, करभार गरीबावर कमी व श्रीमंतावर अधिक पडेल याची काळजी घ्यावी.
3. काही विशिष्ट मर्यादेपर्यत करामाफी असावी.
4. जमिन महसूल लवचिक स्वरूपाचा असावा त्यात बदल करता यावा कराच्या पध्दतीबाबत संपूर्ण दृष्टिकोणच बदलण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली होती.

कर पध्दती दोन गोष्टीवर आधारीत पाहिजे.

अ–निरनिराळया वर्गात कर प्रश्नाबाबत समानता पाहिजे.

ब–लोकांचे राहणीमान कमी होईल अशी करपध्दती असता कामा नये.

त्याचप्रमाणे उत्पन्न मिळविण्यासाठी राज्यसरकारानं केंद्रसरकारवर अवलंबून राहता कामा नये यासाठी विक्रीकर प्रांतीय सरकारच्या अखत्यारीत असला पाहिजे. मालमत्तेच्या कराच्या बाबतीत देखील त्यांची मते अनुकूल अशीच होती. जमिनमहसूल पुरोगामी असावा असे त्यांचे मत होते. यावरून त्यांची पुरोगामी विचार सरणी स्पष्ट होते.

**उद्योग धंदयाचे राष्ट्रीकरण :**

भारतात औद्योगीकरण ही आवश्यक बाब असल्याचे आंबेडकरांनी अनेक वेळा सांगीतले होते. सामाजिक विम्यामुळे कामगारात नोकरीवर शास्वती वाटावी ही उद्योगधंदयाच्या वाढीसाठी आवश्यक बाब आहे. त्यासाठी उद्योग धंदयाचे राष्ट्रीकरण करावे, मात्र त्यासाठी निश्चित अशा योजना असाव्यात तसेच आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण होवू नये. याचे त्यांनी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वात समर्थन केले आहे.

शे.का. फेडरेशन कार्यक्रमात आवश्यक व शक्य तेव्हा उद्योग धंदे ताब्यात घेण्याच्या योजनेलाही मान्यता देण्यात आली होती. पैसा उभा करण्यासाठी 1. ल" करावरील खर्च कमी करणे. 2. मिठावर पुन्हा कर बसविणे 3. दारूबंदी रदद करणे 4. राष्ट्रीय विमा योजना 5. सरकारी व खाजगी नोकरांचा सक्तीने विमा उतरविणे. असेही उपाय जाहिरनाम्यात सुचविण्यात आले होते. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होवू नये. यासाठी भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्वात असलेल्या तरतुरीचे त्यांनी जोरदार समर्थन केले होते.

**कामगार चळवळीचे नेतृत्व :**

समता, स्वातंत्र मुल्याच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी शेत मजुरांना 1948 च्या किमान वेतन कायदयातील तरतुदींचा फायदा मिळवून दिला. 15 सप्टेंबर 1938 मध्ये मुंबई विधिमंडळात संपर्क करणे बेकायदेशिर ठरविण्यारे औद्योगिक कलमाचे विधेयक आले तेव्हा त्याला डॉ. आंबेडकरांनी कडाडून विरोध केला होता. त्यांच्या मते संपक रणे हा दिवाणी अपराध आहे. फौजदारी गुन्हा नव्हे. कामगार संपाच्या हक्काचे डॉ. आंबेडकर समर्थक होते. परंतू हा संप राजकीय हेतूने प्रेरीत नसावा. तो कामगारांच्या हितासाठी असावा असे त्यांचे मत होते.

भारतीय कामगार, शेतकरी व शेतमजुराबाबत डॉ. आंबेडकरांना अतिव आस्था होती. 1938 साली कामगारांनी केलेल्या संपाचे डॉ. आंबेडकरांनी केवळ समर्थन केले नाही तर त्यांचे नेतृत्व केले. यावरून असे म्हणता येईल की, डॉ. आंबेडकर हे त्या काळातील कामगार चळवळीचे प्रभावी नेतृत्व होते.

**अर्थशास्त्रज्ञ डॉ.आंबेडकर**

डॉ. आंबेडकरांनी निरनिराळया प्रसंगी शेती सुधारणा शेतीची पध्दती, औद्योगीकरण, चलन विषयक प्रश्न, सार्वजनिक आयव्य, कामगार चळवळ याा विषयावर विचार व्यक्त होते. या त्यांच्या विचारामागे अस्पृश्यांचा त्यांच्यात भुमीत मजुर व लहान शेतकरी असल्याने त्यांचा उध्दार करणे हा हेतू होता. कालबाहय झालेली शेती पध्दती आता कमी होत चालली असल्यने सामुदायीक भोतीचा अवलंब करावयास पाहिजे असा त्यांचा परीपक्व विचार त्यांनी मांडला होता.

आंबेडकरांच्या अर्थविषयक मतांचा एक नैतिक हेतू होता. मानवी कल्याणावर त्याचा कोणता परिणाम होतो. या दृष्टिकोणातून त्यांनी आर्थिक हालचालीचा अभ्यास केला होता. हा अभ्यास संपत्ती किंवा आर्थिक संबंध या बददलचा नव्हता, तर माणूस वत्याची निवड यांच्याशी संबधीत होता.विषेश म्हणजे सामान्य जणात न्याय रितीने संपत्तीची विभागणी करणे हा हेतू त्यांच्या विचारामागे होता. या बाबतीत सिस्मंडी, रिकार्डो, माल्थस या अर्थशास्त्रज्ञांशी ते सहमत होते. कारण या अर्थशास्त्रज्ञांना अर्थशास्त्रातील कोणत्याही इतर प्रश्नापेक्षा संपत्तीच्या विभाजनाचा प्रश्न महत्वाचा वाटत होता.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणूनच सारा भारत आंबेडकरांना ओळखतो. कायदामंत्री म्हणून ही ते ख्यातमान झाले पण त्यांचा अर्थशास्त्रज्ञ व्यासंग गाढा होता. हे फारच थोडक्यात कळले. बहूजन समाजालना ते घटनाकार व दलित जनतेचे पुढारी म्हणून ज्ञात राहिले. त्यांच्या अर्थशास्त्रांच्या व्यासंगाच्या 21 व्या भातकातील जनतेला अधिक लाभ मिळू शकेल यात दुमत नाही.

**संदर्भ :**

1. धनंजय किर–डॉ.बाबासाहेब आंबेडकर
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन.
3. मधु लिमये–डॉ.बाबासाहेब आंबेडकर
4. डॉ. वा.ना.कुबेर–डॉ.आंबेडकर विचार मंथन